# PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION
# JAGADGURU SANT TUKARAM MAHARAJ SANTPITH SCHOOL & JR. COLLEGE

Patilnagar, Talgaon Chikhali, Pune - 411062

Affiliation No: 1120131 School Code: 32147 UDISE CODE: 27252000538

Contact No: 9022816058 E-mail: santpithschool@gmail.com

**जा.क्र.संतपीठ/स्कूल/०१/कावि/ ४९/२०२६-२०२७** **दिनांक : १३/०६/२०२६**

**कामाचे नाव : पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रवर्तित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेजमधील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठी बेंगलोर, कर्नाटक येथील इस्रो शैक्षणिक अभ्यास दौऱ्यास घेवून जाणेकरीता खुल्या बाजारातून अंदाजित दर मागविणेबाबत...**

## कोटेशन नोटीस क्र. ०७/२०२६-२०२७

पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेजमधील शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ या कालावधीमध्ये बेंगलोर, कर्नाटक येथील इस्रो शैक्षणिक अभ्यास दौरा आयोजित करणेकामी सदर शाळेतील विद्यार्थ्यांच्या घेण्यात आलेल्या इंटर युनिव्हर्सिटी सेंटर ऑफ अॅस्ट्रोनॉमि अॅन्ड अॅस्ट्रोफिजिक्स पुणे या परीक्षेमध्ये प्रज्ञावंत झालेल्या २५ प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसमवेत एक संचालक, सात शिक्षक व एक कार्यालयीन कर्मचारी असे एकूण ३४ व्यक्तींचा बेंगलोर, कर्नाटक येथील इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (ISRO) शैक्षणिक अभ्यास दौऱ्याकरीता अंदाजे खर्च हा किती असेल, याकरीता अशा प्रकारचे प्रवासाचे नियोजन करणाऱ्या एजन्सी कडून सीलबंद दरपत्रक/कोटेशन मागविणेत येत आहे.

प्रवासाचा तपशील खालीलप्रमाणे...

दिनांक ०६ जुलै २०२६ ते ११ जुलै २०२६ शैक्षणिक अभ्यास दौरा प्रवास तक्ता

| दिवस. | दिनांक | तपशील | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ०६/०७/२०२६ | सकाळी १०:३० वा. संतपीठ येथे २५ प्रज्ञावंत विद्यार्थी, सात शिक्षक व एक कार्यालयीन कर्मचारी असे एकूण ३३ व्यक्तींना घेवून पुणे रेल्वेस्टेशन पर्यंत बस सुविधा करणे. रेल्वे प्रवास दरम्यान दुपार व रात्रीच्या भोजनाची व्यवस्था करणे. | |
| २ | ०७/०७/२०२६ | पहाटे ३:३० वा. संतपीठ येथे एक अधिकारी व्यक्तींना घेवून पुणे विमानतळापर्यंत गाडीची सुविधा करणे. बंगळूरू विमानतळावरून अंदाजे सकाळी ०७:३० वा निवासस्थानी पोहचणे. तसेच विद्यार्थी, शिक्षक व कार्यालयीन कर्मचारी यांस बंगळुरू रेल्वे स्थानकावरून अंदाजे सकाळी ०७:०० वा. पर्यंत निवासस्थानी पोहचणे, निवासस्थानी सकाळचा नाश्ता केलेनंतर विद्यार्थी, शिक्षक, कार्यालयीन कर्मचारी व अधिकारी यांस सायंकाळी ६/७ पर्यंत निवास स्थानाजवळील गार्डन, ऐतिहासिक, सांस्कृतिक वास्तुंचे दर्शन घडविणे, दुपारचे भोजन करणे व रात्रीचे भोजन निवासस्थानी करणे. | |
| | ०८/०७/२०२६ | निवासस्थानी सकाळचा नाश्ता केलेनंतर एकूण ३५ व्यक्तींची दुपारी १:३० ते २:३० या वेळेत इस्रो नियोजित भेट.<br>त्यानंतर बंगळूर येथील स्थानिक स्थळदर्शनासाठी विश्वेश्वरैया औद्योगिक आणि तंत्रज्ञान संग्रहालय, जवाहरलाल नेहरू तारांगण, इंदिरा गांधी म्युझिकल फाउंटन पार्क, आणि एम.जी. रोड व ब्रिगेड रोड यांसारख्या स्थळांना भेट देणे. सदर दौऱ्यादरम्यान स्थानिक रेस्टॉरंटमध्ये दुपारच्या जेवणाची व्यवस्था करणे. रात्रीचे जेवण आणि निवासी व्यवस्था बंगळूरुमध्ये करणे. | |
| | ०९/०७/२०२६ | सकाळी ७/८ पर्यंत बंगळूरुमधील निवासस्थानी नाश्ता आणि चेक-आउट केल्यानंतर, सकाळी १०:३० ते ११:३० या वेळेत नियोजित भेटीसाठी ब्रेन म्युझियमकडे भेट देणे. भेटीनंतर, म्हैसूरकडे प्रवासाला सुरुवात करून प्रवासदरम्यान दुपारच्या जेवणाची व्यवस्था करणे. त्यानंतर म्हैसूर शहरातील प्रेक्षणीय स्थळे म्हैसूर पॅलेस, म्युझीयम इ.पाहणे. रात्री जवळील हॉटेलमध्ये चेक -इन करून रात्रीचे जेवण व निवासी व्यवस्था करणे. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | १०/०७/२०२६ | सकाळी ७/८ पर्यंत म्हैसूर निवासस्थानी नाश्ता आणि चेक-आउट केल्यानंतर चामुंडी टेकड्या, चामुंडेश्वरी मंदिर, सेंट फिलोमेना चर्च, म्हैसूर प्राणीसंग्रहालय आणि वृंदावन गार्डन्स यांस भेट दौऱ्यादरम्यान एका स्थानिक रेस्टॉरंटमध्ये दुपारच्या जेवणाची व्यवस्था करणे. शहर दर्शनाचा कार्यक्रम पूर्ण झाल्यावर, दुपारी बंगळूरकडे प्रस्थानदरम्यान रात्रीच्या जेवणाची व्यवस्था करणे.<br><br>त्यानंतर सर्व विदयार्थी व कर्मचारी असे एकूण ३३ व्यक्तींना बंगळूरु रेल्वे स्थानकापर्यंत पोहोचविणे.<br>तसेच एक अधिकारी यांस बंगळूरु येथून विमानप्रवासामार्ग पुणे विमानतळावर ११:१० वा पर्यंत पोहचणे व पुणे विमानतळावरून संतपीठ येथे सोडणे. | |
| | ११/०७/२०२६ | एकूण ३३ व्यक्तींचे तिकीट आधीच बुक असल्याने ते पुणे रेल्वे स्थानकापर्यंत दुपारी ०४:१५ वा पर्यंत पोहचतील. परंतु रेल्वे प्रवास सकाळचा नाश्ता व दुपारच्या भोजनाची व्यवस्था करणे. पुणे रेल्वे स्थानकावरून संतपीठ येथे सर्व विदयार्थी, शिक्षक व कार्यालयीन कर्मचारी यांना सोडणे. | |

**कोटेशन नोटीस व नियम अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१. इच्छुक ठेकेदारांनी / पुरवठाधाराकांनी उपरोक्त नमूद केलेल्या कामाचे दर दिलेल्या स्पेशिफिकेशन नुसार व आवश्यक त्या कागदपत्रांसह सिलबंद पाकिटात मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज यांचे नावे दिनांक - १३/०६/२०२६ ते दि - २०/०६/२०२६ अखेर दुपारी ३:०० वाजेपर्यंत जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज हे पाटीलनगर, टाळगाव चिखली, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे ४११०६२ येथे सादर करावे.

२. पुरवठा धारकाने कोटेशन सोबत शॉप ॲक्ट नोंदणी / उद्योम आधार दाखला, पॅनकार्ड, जी.एस.टी नोंदणी पुरावा व मागील दोन वर्षाचा आयकर पुरावा इ. कागदपत्रांच्या प्रती सादर करण्यात याव्यात.

३. प्रवासाचे दर सर्व करांसहित देण्यात यावे.

४. तपशीलवार प्रतिदिन एकूण अंदाजित खर्च प्रदान करावा.

५. शहरांतर्गत प्रवास, भोजन, मुक्काम, तिकीट इ. साठी स्पष्ट श्रेणींसह प्रति व्यक्ती अंदाजे खर्च प्रदान करा.

६. कृपया एक कार्यकारी/समन्वयक प्रदान करावा जो प्रवास इत्यादीसाठी जबाबदार असेल.

७. मागणी केलेल्या विविध श्रेणींची किंमत परवडणारी असावी आणि बाजाराच्या दरांशी जुळली पाहिजे.

८. वरीलपैकी काही ठिकाणे बदलू शकतात आणि ते बदल कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय उपलब्ध करून देणेत यावे.

९. शैक्षणिक अभ्यास दौऱ्यासाठी असलेल्या २५ विद्यार्थ्यांसाठी तिहेरी शेअरिंग रूम आणि १० प्रौढांसाठी (शक्यतो ट्विन बेडसह) दुहेरी शेअरिंग रूम असावी.

१०. सिलबंद कोटेशन पाकिटावर नोटीस क्रमांक फर्म /कंपनीचे नावाचा स्पष्ट उल्लेख करावा.

११. उशिरा आलेल्या व अपुऱ्या तसेच अटीयुक्त कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

१२. कोटेशन संपूर्ण प्रक्रियेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ) हे लवाद म्हणुन जो निर्णय देतील तो अंतिम राहील. जो उभयंतावर बंधनकारक राहील.

१३. कोणतेही कोटेशन मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ यांनी राखून ठेवला आहे.

१४. सदरची कोटेशन नोटीस संतपीठाचे www.santpithpcmc.com या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

**संदीप खोत**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ